स्वयंप्रज्ञ: स्थितप्रज्ञ: कर्मयोगी सत्यव्रत: ।
रावोपाधिसम्मानितो धर्मभूषण: चिरं जयतु ॥

ईस्ट खान्देश एज्युकेशन सोसायटी संचलित,

रावसाहेब रूपचंद विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, जळगाव.

प्रभाकर

२००९-१०

९४ वर्षांची 'प्रतिभा संपन्न' उडडवल परंपरा ...

श्रीमती राजश्री बिर्ला (अध्यक्षा, आदित्य बिर्ला गृप) यांना संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. अरविंदभाऊ लाठी शाळेचा 'प्रभाकर' अंक भेट देतांना सोबत मा. आ. श्री. सुरेशदादा जैन, पद्मश्री भवरलालजी जैन व ओमप्रकाशजी जाजू

ईस्ट खान्देश एज्युकेशन सोसायटी, संचलित

रावसाहेब रूपचंद विद्यालय, जळगाव

सन्मान पत्र

पद्मश्री भंवरलालजी हिरालालजी जैन

(अध्यक्ष, जैन उद्योग समूह)

क्षितिजापलीकडे पाहणारी दिव्यदृष्टी, परिणत विद्वत्ता, अभिजात सेवापरायणता, अफाट कर्तृत्व या गुणवैभवाच्या पाथेयावर सगळा समाज सांधावा, बांधावा, सावरावा व सजवावा हे ध्येय उरात घेऊन शेती आणि शेतकरी संपन्नतेच्या शिखरावर नेण्यासाठी प्रयत्नरत असणाऱ्या खान्देशच्या भूमीपुत्राचा भारत सरकारने 'पद्मश्री' प्रदान करून गौरव केला याचा आम्हास सार्थ अभिमान आहे.

गुणवैभवाचे हे पाथेय 'रावसाहेब रूपचंद विद्यालयातून' घेऊन कर्तृत्वाच्या गौरीशंकरावर आपण आपली नाममुद्रा अंकीत केली, याहून आनंदाची अनुभूती आमच्यासाठी आणखी काय असू शकते? पाण्याचा प्रत्येक थेंबाचे मोल जाणणारी आपली दिव्यदृष्टी केवळ सिंचनापुरती मर्यादित न ठेवता सर्व मानवी जीवनच संस्कारांनी सिंचित करणारा विचार पेरला गेला. त्यामुळे आपल्यातील विचारवंतही विश्वसंचार करू शकला.

जेथे चैतन्य असते तेथे नवनिर्मिती असते. सामर्थ्य असते. जीवनमूल्ये हीच जीवनगंगा असते. त्याचा प्रत्येक थेंब, प्रत्येक किनारा पवित्र असतो. हे पावित्र्य जपणारा आणि देणारा आपला कर्मयोग सर्वश्रेष्ठ आहे.

भाऊ, हे सन्मानपत्र संपन्न व्यक्तिमत्वाचा ध्रुवतारा समोर ठेवून चालणाऱ्याचे जीवन हीच यशोगाथा मानणाऱ्या विद्वानाचा, व्यासंगी विचारवंताचा, उद्योग महर्षीचा, कर्मयोग्याचा, भूमिपुत्राच्या जीवनाचा सन्मान आहे.

अरविंद बंकटलाल लाठी

अध्यक्ष, ईस्ट खान्देश एन्युकेशन सोसायटी,जळगाव

जळगाव

दि. १३ ऑगस्ट ०९

भेटी मान्यवरांच्या

पद्मश्री. भवरलालजी जैन यांना संस्थेतर्फे मानपत्र देऊन सन्मानित करतांना संस्थाध्यक्ष मा. श्री. अरविंदभाऊ लाठीव मान्यवर

इ. १०वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करतांना पद्मश्री. भवरलालजी जैन सोबत संस्थाध्यक्ष, मा.श्री. अरविंदभाऊ लाठी व मान्यवर

इ.१०वी विद्यार्थी निरोप समारंभ प्रसंगी मार्गदर्शन करतांना डॉ. श्री. भरत बोरोले

इ. १२ वी विद्यार्थी निरोप समारंभ प्रसंगी मार्गदर्शन करतांना मा. डॉ. श्री. डी. डी. नारखेडे

रावसाहेब पुण्यतिथी निमित्त आयोजित 'चिंतन दिन' कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना प्रमुख अतिथी डॉ. एम. व्ही. बरिदे, कुलसचिव उ.म. वि

कलाक्रीडाविज्ञानवेध समारोप प्रसंगी मार्गदर्शन करतांना मा. श्री. सुभाष रेवतकर, जिल्हाक्रीडा अधिकारी व सोबत मान्यवर

हृदयाचे ठोके चुकवणारा,खान्देश महोत्सव...!

..... कु.गौरी रमेश सदावर्ते, इ.१० वी (ब)

वाम खान्देश, सलाम

जानेवारी : खान्देश संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या दिवसांच्या खान्देश महोत्सवाचा उद्या (गुरुवारी) ह्या थाटात शुभारंभ होणार असून महोत्सवाची तयारी ा अंतिम टप्प्यात असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुणालकुमार यांनी आज जळगावच्या पत्रकार परिषदेत ी.

यत तयारी : 'न भूतो न भविष्यती' अशा रुपातील या महोत्सवाच्या शुभारंभाची जय्यत तयारी रातील विविध ठिकाणी सुरु झाली असून बॅनर्स, टर्स, स्वागत कमानींनी शहर सजलेले आहे.

जानेवारी : बालगंधर्व खुले नाट्यगृहाच्या ंचावर सुदृढ बालक स्पर्धा व पथनाट्य तर सागर ंच्या मैदानावर खान्देश जत्रा व खान्देशी पंगतीचे ाटन तसेच दुपारी लेवा बोर्डींग व पोलीस ीपर्पज हॉल येथे खान्देश जतन प्रदर्शन, खान्देश कचे आज उद्घाटन झाले. उद्घाटन प्रसंगी गपती पद्मश्री डॉ.भंवरलालभाऊ जैन, स्मिता वाघ, संजय सावकारे, महापौर प्रदीपभाऊ रायसोनी, रलाल जैन, आ.साहेबराव धोंडू पाटील, प्रा.अस्मिता ोल आणि या कार्यक्रमाचे शिल्पकार जिल्हाधिकारी कुणाल कुमार, आदी प्रमुख पाहुणे उपस्थित होते.

न्देशी पंगत : सागर पार्कवरची खान्देशी पंगत जबाब होती. या पंगतीत लबाड वांगे व रावरची पुरणपोळी, बाजरीची भाकरी, भरीत, ठेचा, री रोटी, भेळ, पाणीपुरी, मुंगाची भजी यांनी देशी लोकांच्या तोंडाला पाणी सोडले.

रंग : नावाप्रमाणे रंगवून टाकणारा, जिल्हा क्रिडा ंगावरील गीतांचा कार्यक्रमाचा एक वेगळाच दणकेबाज का होता. या कार्यक्रमास अवधूत गुप्तेंची खास स्थिती लाभली.

जानेवारी : खान्देश महोत्सवाचे दीपप्रज्ज्वलनाने घाटन करतांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री.अशोक ाण, सोबत महापौर श्री.प्रदीप रायसोनी, ईश्वरलाल जैन, स्मिता वाघ, जिल्हाधिकारी श्री.कुणालकुमार, राज्यमंत्री श्री.गुलाबराव देवकर, श्री.देवीसिंग शेखावत, आ.दिलीप वाघ, एकनाथराव खडसे, उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ, ना.डॉ.विजयकुमार गावीत, आ.सुरेशदादा जैन, आ.मधु जैन, ना.धों. महानोर आदी उपस्थित होते. याप्रसंगी खान्देशात सहा पदरी महामार्ग अशी घोषणा मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी खान्देश महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी केली.

डोळ्यांचे पारणे फेडणारी खान्देश दिंडी :

खान्देश महोत्सव ट्रस्टतर्फे आयोजित सांस्कृतिक दिंडीच्या शुभारंभ प्रसंगी राज्यमंत्री श्री.गुलाबरावजी देवकर, श्री.राजकुमार अडवाणी, ॲड.रविंद्र पाटील, महापौर श्री.प्रदीप रायसोनी, जिल्हाधिकारी श्री.कुणालकुमार, आ.एकनाथराव खडसे, श्री.अशोक जैन, श्री.विष्णु भंगाळे, आ.सुरेशदादा जैन आदी उपस्थित होते. या दिंडीतून खान्देशी लोककला, परंपरांचे दर्शन जनतेचा घडले. जळगांव, धुळे, नंदुरबार येथील विद्यार्थ्यांवर विविध संस्थांचे ७० एकापेक्षा एक सुंदर चित्ररथ यात सहभागी झाले होते. या दिंडीनिमीत्ताने खान्देशी मुळची आदिवासी संस्कृती, नृत्य व गीते यांचे दर्शन जनतेला घडले. लोक संघर्ष मोर्चा यांनी पारंपारिक पावरी नृत्य, होळी नृत्य मार्गात ठिकठिकाणी सादर करुन जनतेची मने जिंकली, त्यांच्याकडून जोरदार टाळ्या घेतल्या.

श्रेया घोषालच्या गीतांनी श्रोते मदहोश !

चोहीकडे टाळ्या आणि शिट्टयांनी होणारा जल्लोषाचा माहोल, मोठ्यांपासून-लहानापर्यंत रसिक श्रोते आणि प्रेक्षकांची झालेली तुफान गर्दी, आकर्षक व्यासपीठावर रंगबिरंगी प्रकाशाची होणारी उधळण अन् जोडीला मदहोश करणाऱ्या सुरेल आवाजाने ख्यातनाम गायिका श्रेया घोषालने रसिकांना जिंकले.

'तुझमें रब, दिखता है, यारा मैं क्या करु, सजदे सर झुकता है, यारा मैं क्या करुं'' या गीताचा आधार घेत रसिकांना सलाम करणाऱ्या श्रेयाने थेट जळगाववासियांच्या काळजालाच हात घातला.

श्रोत्यांची फर्माईश आणि 'वन्समोर' च्या कल्लोळात 'दिल खो गया है', 'सिंग इज किंग', 'जोगवा', 'जब वी मेट', 'भुलभुलैय्या', 'वेलकम', 'खाकी', 'कुर्बान' ने पुन्हा प्रेक्षकांना नाचायला भाग पाडले. श्रोत्यांची फर्माइश वाढत होती आणि घड्याळ्याचा काटाही पुढे-पुढे सरकत होता. त्याचा ताळमेळ साधत 'गुनगुनाती है ये हवा' मधील गीतांनी जल्लोषाची परिसीमा गाठली असतांनाच श्रेयाने 'थँक्यू जळगांव', 'थँक्यू खान्देश' म्हणत रसिकांचा निरोप घेतला. या दरम्यान, जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव देवकर आणि जि.प.अध्यक्ष स्मिता वाघ यांच्या हस्ते श्रेयाचा सत्कार झाला.

३१ जानेवारी :- पुढील वर्षीसुध्दा जळगावला खान्देश महोत्सव घेऊ आणि त्यासाठी निधी उपलब्ध करुन देऊ अशी दणदणीत घोषणा राज्याचे पर्यटन मंत्री डॉ.विजयकुमार गावीत यांनी आज येथे पुढील खान्देश महोत्सव २० ते २३ जानेवारी या दरम्यान घेण्यात येईल. अशी घो जिल्हाधिकारी कुणाल कुमार यांनी केली.

खान्देश महोत्सव ट्रस्टच्या वतीने गेल्या दिवस चाललेल्या खान्देश महोत्सवाची आज सायं सांगता झाली. छत्रपती शिवाजी महाराज संकुलात समारोपाच कार्यक्रम झाला. समारोपा पंकज उधास यांच्या गजलांचा कार्यक्रम असल्याने संकुलाचे मैदान रेकॉर्ड ब्रेक 'हाऊसफुल्ल' झाले

असा रंगला २०१० चा खान्देश महो चला निरोप घेते मी.

धन्यवाद !

स्वाभिमान

ते जीवनच काय
ज्यात गाव-वेशीबाहेर जगायचे असते.
ते जेवणच काय
जे उकिरडा हुंगून पोटात ढकलायचे असते
ते रस्तेच काय
ज्यावर कमरेला झाडू बांधून चालायचे असते
ते लोकच काय
जे नसतात घटक या समाजाचे
त्या लोकांचा तो स्वाभिमानच काय
जो त्यांना तयार करतो ते लोंढणं
मानेवर अडकवायला, उपेक्षितासारख जगायला
या स्वाभिमानातला 'स्व' तर कधीच मरुन गेला
उरला 'अभिमान' तो फक्त बाबा, बाबा आणि फक्त 'बाबांमुळेच'.

कु.प्राजक्ता बापुराव पानपाटील
इ. ९ वी (ब)

सांग ना ....

इमारीच्या आगमनाला
वृक्षांनी का इतके भ्यावे
कोसळा मम घरटे घेऊन
सांग आता मी कोठे जावे ।।

साऱ्यांना तु देशी निवारा,
तरीही माणूस तुज अति प्यारा.
तू सगळ्यांची माता असता,
का ग तवं बालक भटकावे?

जाईन मी ही दुसऱ्या स्थानी
बांधीन ही घरटे कष्टाने
मिटेल का ग मनाची चिंता
हे मजला ना अजुनी ठावे ।।

भेदभाव हा करिसी कसला
विसरलीस का कर्तव्याला
शपथ तुला ग तवं बाळांची
आता तरी तु जागे व्हावे

कु.प्रणिता चंद्रकांत जडे
इ. ९ वी अ

एक दृष्टिक्षेप...